**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र. १३५

दिनांक २४/०५/२०२१

## घरफोडी करणा-यास नवघर पोलीसांनी पकडून चोरीस गेलेला मुद्देमाल केला हस्तगत

दि. २१.०५.२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३८३/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी विजयप्रकाश अशोकभोला सिंग वय-२४ वर्षे यांचा शॉप नं-०१, अमर इस्टेट, नवघर रोड टेम्पो स्टॅंट, नवघर रोड, भाईंदर-पुर्व, ठाणे येथे गृहउपयोगी भांडी बनविण्याचे पञ्याचे प्रेसिंग करण्याचा व्यवसाय आहे. सदर ठिकाणाहुन फिर्यादी यांचाकडे प्रेसिंग साठी आलेल्या प्रेसिंगच्या पञ्याचा एकुन-१२५० किलो वजनाचा रुपये-१,२५,०००/- किंमतीचा मुददेमाल अज्ञात आरोपी यांनी दि.२०/०५/२०२१ रोजी शॉपचे शटर उचकुट रात्रीच्यावेळी चोरी करुन नेला असल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने नमुदप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास व बातमीदार यांच्या आधारे तपास करुन नमुद गुन्हा हा आरोपी नामे उस्मान अबदार मंडोल वय-२३ वर्षे याने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपी नामे उस्मान अबदार मंडोल यास इंदिरानगर झोपडपटटी, नवघर गाव, भाईंदर-पुर्व, ठाणे येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास करुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर आरोपीकडुन त्याने गुन्हयातील चोरी केलेला संपुर्ण मुददेमाल व आरोपी याने चोरी करण्यासाठी वापरलेली तीनचाकी सायकल असा एकुन-१,२५,०००/- किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हा दाखल होताच व गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून तांत्रीक मदत व बातमीदारांच्या आधारे तपास करुन तात्काळ नमूद गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील चोरी झालेला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ व श्री डॉ. शशीकांत भोसले सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केली आहे.